ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(मनोज वराडे)
उप जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.२२
दिनांक : २५.११.२०२१

# मुंबई शहरातील पर्यटन सेवेबाबत

मुंबई, २५ - दक्षिण मुंबईमध्ये पर्यटक आणि मुंबईकर जनतेसाठी दिनांक ०३ नोव्हेंबर २०२१ पासून खुल्या दुमजली बसगाडीतून पर्यटन सेवेचा शुभारंभ करण्यात आला.

सुरुवातीला सायंकाळी ६.३० आणि रात्री ८.०० वाजता गेट वे ऑफ इंडिया येथून दोन बसफे-या शनिवार आणि रविवार यादिवशी प्रवर्तित करण्यात येत होत्या.

परंतु, प्रवाशांचा भरघोस प्रतिसाद लक्षात घेऊन नरिमन पॉईंट येथून दुपारी ३.०० आणि सायंकाळी ५.०० वाजता दोन अतिरिक्त बसफे-या नरिमन पॉईंट येथून सुरु करण्यात आल्या.

दररोज सरासरी २०० पर्यटक आणि मुंबईकर या पर्यटन बससेवेचा लाभ घेत आहेत. अशा प्रकारे या पर्यटन बससेवेला प्रवाशांचा मिळालेला वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन केवळ सोमवार ते शुक्रवार या दरम्यान वाढविण्यात आलेली ही बससेवा प्रवाशांच्या मागणीनुसार आणि सोयीकरिता शनिवार दिनांक २७.११.२०२१ पासून फक्त शनिवार आणि रविवार या दिवशी सकाळी ०९.३० आणि ११.०० वाजता दोन अतिरिक्त बसफे-या बेस्ट उपक्रमामार्फत चालविण्यात येणार आहेत.

सदर बससेवा दररोज दुपारी ३.०० आणि सायंकाळी ५.०० वाजता नरिमन पॉईंट येथून तर सायंकाळी ६.३० ते रात्री ८.०० वाजता गेट वे ऑफ इंडिया येथून कार्यरत आहे.

पर्यटकांना तिकीट विक्रीसाठी तसेच अन्य माहितीकरिता डॉ.शामाप्रसाद मुखर्जी चौक याठिकाणी संपर्क साधता येईल त्याशिवाय बेस्ट उपक्रमाचा टोल फी क्रमांक १८०० २२७ ५५० आणि ०२२२४१९०११७ या दूरध्वनी क्रमांकावर देखील या पर्यटनसेवेविषयी माहिती मिळू शकेल. दादर तिकीट BookMyShow App वर सुध्दा उपलब्ध आहे.

तरी, सर्व मुंबईकर जनतेने याचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

.....

कृपया प्रसिद्धीकरिता सादर

मधुकर राडे

२८/११/२०२१

उप जनता संपर्क अधिकारी


PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING

(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)

BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम

(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)

बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२, मुंबई - ४०० ००१.


प्रसिद्धी पत्रक क्र. २३

दिनांक - २८/११/२०२१

## "Hop On - Hop Off - HO-HO" बससेवेचा लोकार्पण सोहळा

मुंबई, २८ - मुंबई शहरातील नागरिक आणि पर्यटकांना सुरक्षित तसेच किफायतशीर पर्यटन बससेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून साकारणाऱ्या "Hop On Hop Off अर्थात HO-HO" या इलेक्ट्रिक वातानुकूलित बससेवेचा लोकार्पण सोहळा मंगळवार, दिनांक ३० नोव्हेंबर २०२१ रोजी बेस्ट उपक्रमाच्या कुलाबा आगारात सकाळी ११ वाजता महाराष्ट्राचे पर्यटन, पर्यावरण आणि राजशिष्टाचार मंत्री मा. आदित्य ठाकरे यांच्या शुभहस्ते आयोजित केला आहे.

सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेदरम्यान दर अर्ध्या तासाच्या अंतराने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि जुहू चौपाटी या ठिकाणाहून कार्यान्वित होणाऱ्या या बससेवेचे शुल्क प्रति व्यक्ति प्रति फेरी रु. २५०/- इतके असून एकदा तिकिट खरेदी केल्यावर व्यक्ती दिवसभर विविध प्रेक्षणीय स्थळांचा मनसोक्त आनंद घेऊ शकतात. एखादया ठिकाणी उतरून त्या स्थळाचा मनसोक्त आनंद घेऊन दुसऱ्या बसने त्याच तिकिटाद्वारे पुढील पर्यटन सेवेचा लाभ घेण्याची मुभा देण्यात आलेली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सुरू होणाऱ्या या बससेवेचा मार्ग जिजामाता उद्यान, जुहू चौपाटी, वांद्रे बँड स्टँड, श्रीसिद्धीविनायक मंदिर, नेहरू तारांगण, गिरगाव चौपाटी, तारापोरवाला मत्स्यालय असा असून या प्रवासात बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, ग्लोरिया चर्च, वांद्रे रेक्लमेशन, लिलावती रुग्णालय, सिने कलाकारांचे बंगले, लिंकिंग रोड, जुहू रोड, राजीव गांधी सागरी सेतू, हाजीअली, बाबूलनाथ मंदिर, वानखेडे स्टेडियम, नरिमन पॉईंट, मंत्रालय अशा विविध प्रेक्षणीय स्थळांचे बसमधून दर्शन करविण्यात येणार आहे.

तरी सर्व पर्यटक आणि मुंबईकर जनतेने या अनोख्या पर्यटन बससेवेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

---x---

THE BRIHAN MUMBAI
ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(मनोज वराडे)
उप जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.२४
दिनांक : १५.१२.२०२१

## मुंबई शहरामध्ये Hop On – Hop Off – " Ho-Ho"
## <u>वातानुकूलित इलेक्ट्रिक पर्यटन बस सेवा</u>

मुंबई, १५ - मुंबई शहरातील नागरिक आणि पर्यटकांना सुरक्षित आणि किफायतशीर पर्यटन बस सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून साकारणा-या ' Hop On – Hop Off अर्थात " Ho-Ho" या इलेक्ट्रिक वातानुकूलित बससेवेचा लोकार्पण सोहळा **शुक्रवार दिनांक १७ डिसेंबर २०२१ रोजी** बेस्ट उपक्रमाच्या **वरळी आगारात सायंकाळी ६.३० वाजता महाराष्ट्राचे पर्यटन, पर्यावरण आणि राजशिष्टाचार मंत्री ना. आदित्य ठाकरे यांच्या शुभहस्ते** आयोजित केला आहे.

सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेदरम्यान दर अर्ध्या तासाच्या अंतराने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि जुहू चौपाटी याठिकाणांहून कार्यान्वित होणा-या या बससवेचे शुल्क प्रती व्यक्ती, प्रति फेरी रुपये २५०/- इतके असून एकदा तिकीट खरेदी केल्यानंतर व्यक्ती दिवसभर विविध प्रेक्षणिय स्थळांचा मनसोक्त आनंद घेऊ शकतात. एखाद्या पर्यटनस्थळी बसगाडीतून उतरुन त्या स्थळाची पाहणी केल्यानंतर दुस-या बसने त्याच तिकीटाद्वारे पुढील पर्यटन सेवेचा लाभ घेऊ शकतात.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सुरु होणा-या या बससेवेचा मार्ग जिजामाता उद्यान (राणीबाग-भाऊ दाजी लाड वस्तूसंग्रहालय)- जुहु उद्यान- जुहू चौपाटी – वांद्रे बँड स्टँड- श्री सिद्धीविनायक मंदिर- नेहरू तारांगण- गिरगांव चौपाटी- तारापोरवाला मत्स्यालय मार्गे पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय(म्युझियम) असा प्रवासमार्ग या बससेवेमध्ये निश्चित करण्यात आलेला असून त्याव्यतिरिक्त बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय – ग्लोरीया चर्च (भायखळा)– वांद्रे रेक्लमेशन – लिलावती रुग्णालय – सिनेकलाकारांचे बंगले - लिकिंग रोड - जुहू रोड – राजीव गांधी सागरी सेतू – नेहरु तारांगण - हाजीअली – पेडर रोड - बाबुलनाथ मंदिर – वानखेडे स्टेडियम – नरीमन पॉइंट - मंत्रालय या प्रेक्षणीय स्थळांचे बसगाडीमधून दर्शन करविण्यात येणार आहे.

तरी सर्व पर्यटक आणि मुंबईकर जनतेने शनिवार दिनांक १८ डिसेंबर २०१९ पासून सुरु होणा-या या अनोख्या पर्यटन बससेवेचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

....

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक,
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

मसुवराडे 20/12/2021

(मनोज वराडे)
उप जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.२५
दिनांक : २०.१२.२०२१

## "CHALO" ॲप आणि बेस्ट स्मार्ट कार्ड यांचा लोकार्पण सोहळा

मुंबई, २० - बेस्ट उपक्रमाच्या डिजीटायझेशन प्रकल्पाचा एक भाग म्हणून बसगाडयांमधून प्रवास करणा-या प्रवाशांना अत्याधुनिक सुविधा देण्याच्या दृष्टीने ' Chalo Mobile App ' आणि ' बेस्ट स्मार्ट कार्ड ' यांचा लोकार्पण सोहळा दिनांक मंगळवार दिनांक २१ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता सह्याद्री अतिथी गृहातील प्रेक्षागृह येथे महाराष्ट्र राज्याचे पर्यावरण, पर्यटन आणि राज्य शिष्टाचार मंत्री नामदार श्री. आदित्य ठाकरे यांच्या शुभहस्ते आयोजित करण्यात आला आहे.

बेस्ट उपक्रमाच्या विद्यमान तिकीट वितरण पध्दतीचे तसेच बसपासचे देखील आधुनिकीकरण करुन येत आहे. स्मार्टकार्डच्या सहाय्याने नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्डशी (NCMC) अनुरुप (compliant) स्वयंचलित बसभाडे जमा यंत्रणेच्या (AFCS) माध्यमातून विद्यमान तिकीट वितरण प्रणालीचे अद्ययावतीकरण आणि नवीन बसपास पध्दती सुरु करण्यात येत आहे.

या प्रणालीअंतर्गत इलेक्ट्रॉनिक तिकीटिंग इश्युइंग मशीनमध्ये रोख रकमेच्या सहाय्याने नियमित तिकीट / बसपास वितरणाबरोबरच नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (NCMC), स्मार्टकार्ड आणि भ्रमणध्वनीच्या सहाय्याने ई-पर्स (E-purse) च्या माध्यमातून तिकीट / बसपास वितरणाची देखील व्यवस्था करण्यात आलेली आहे. भ्रमणध्वनीच्या सहाय्याने ई-पर्स (E-purse) च्या माध्यमातून तिकीट / बसपासची सुविधा प्राप्त करण्याकरीता विकसित केलेले "CHALO" हे मोबाईल ॲप गुगल प्ले स्टोअर अथवा https://play.google.com/store/apps/details?id=app.zophop या लिंकवरुन भ्रमणध्वनीमध्ये डाऊनलोड करणे आवश्यक आहे.

जे प्रवासी रोख रक्कम अथवा भ्रमणध्वनीद्वारे तिकीट / बसपास घेऊ इच्छीत नाहीत, त्यांना बेस्ट उपक्रमाचे स्मार्टकार्ड किंवा नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (NCMC) घ्यावे लागेल. या स्मार्टकार्डमध्ये ई-पर्स (E-purse) व बसपास अशा दुहेरी सेवा उपलब्ध करण्यात येतील. प्रवाशांना त्यांच्या सोयीनुसार या सुविधेचा लाभ घेता येईल.

या प्रस्तावित बसपास पध्दतीमध्ये प्रवाशांनी प्रवास केलेल्या अंतराची तपशीलवार अचूक माहिती उपलब्ध होणार असून एकूण बसफे-यांची नोंद देखील होणार आहे.

प्रवाशांना त्यांच्या विद्यमान प्रवासभाडयाच्या / प्रवासाच्या ठिकाणांच्या अनुषंगाने ठराविक अंतरावर आधारीत मूल्यवर्गाच्या बसपासची निवड करता येईल.

सदर मोबाईल ॲपद्वारे बसच्या आगमनाची अचूक माहिती, बसमध्ये किती गर्दी आहे याची माहिती प्रवाशांना कळू शकेल त्यामुळे बसथांब्यावरील गर्दी कमी होईल आणि प्रवाशांना घरी बसून तिकीट काढणे तसेच प्रवासाची वेळ निश्चित करणे शक्य होईल. नुकतेच जाहिर करण्यात आलेले नवीन बस पासेस देखील या मोबाईल ॲप आणि स्मार्ट कार्डद्वारे खरेदी करणे तसेच त्यांचे नूतनीकरण करणे देखील शक्य होईल.

तरी सर्व मुंबईकर जनतेने या अत्याधुनिक सुविधेचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहन बेस्ट उपक्रमाद्वारे करण्यात येत आहे.

.....

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरव
आणि परिवहन उप
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंत
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(मनोज वराडे)
उप जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.२६
दिनांक : २३.१२.२०२१

## बेस्ट उपक्रमातर्फे नव वर्षाची भेट

मुंबई, २३ - बेस्ट उपक्रमाकडून नुकत्याच सुरु करण्यात आलेल्या Hop On – Hop Off अर्थात हो-हो पर्यटन बससेवेला मुंबईकर आणि पर्यटकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

या प्रतिसादाच्या अनुषंगाने बेस्ट उपक्रमाने मुंबईकर जनता आणि पर्यटकांकरिता एक अभिनव योजना हो-हो बससेवेकरिता लागू करण्याचे ठरविले आहे.

सदर योजनेअंतर्गत किमान २० प्रवासी किंवा त्यापेक्षा जास्त प्रवाशांनी हो-हो पर्यटन बससेवेचे एकत्रित आरक्षण केल्यास बसभाड्यामध्ये १० टक्के इतकी सूट बेस्ट उपक्रमाकडून देण्यात येणार आहे.

तरी विशेष करुन सामाजिक संस्था, व्यवसाय संस्था (Corporates) शैक्षणिक संस्था, गृहनिर्माण संस्था अशा विविध संस्थांना तसेच कौटुंबिक पर्यटनाचा आनंद घेऊ इच्छिणा-या तमाम मुंबईकरांना याचा लाभ घेता येईल.

सदर सवलतीच्या योजनेचा अधिकाधिक लोकांनी लाभ घेऊन बेस्टच्या या ' बेस्ट ' पर्यटन सेवेचा आनंद घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

.....

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक,
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

मनोज वराडे
२८/१२/२०२१

(मनोज वराडे)
उप जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.२७
दिनांक : २८.१२.२०२१

## बेस्ट च्या 'चलो मोबाईल' ॲपला उदंड प्रतिसाद

मुंबई,२८ - अलिकडेच बेस्ट उपक्रमाने मुंबईकर बस प्रवाशांच्या सुलभ प्रवासासाठी विविध अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेले 'चलो मोबाईल' ॲप सेवेत दाखल केले आहे.

आठवडाभरातच साधारणपणे १,०२,३६० मुंबईकरांनी सदर ' चलो ॲप ' त्यांच्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करुन 'बेस्ट'च्या या नव्या डिजिटल तिकीट प्रणालीचे जंगी स्वागत केले आहे.

सदर ॲपमध्ये बसगाडीच्या आगमनासाठीचे "लाईव्ह ट्रॅकिंग" करण्याची सुविधा उपलब्ध असल्यामुळे बसथांब्यावर येणा-या बसची अचूक वेळ कळते. त्यामुळे प्रवाशांच्या वेळेची बचत होते. त्याचप्रमाणे बसमध्ये बसायला आसने रिकामी आहेत की नाही, गर्दी किती आहे याची देखील माहिती मिळते.

तसेच बेस्ट उपक्रमाने नव्याने अंमलात आणलेल्या "सुपर सेवर" योजनेची माहिती आणि त्यानुसार फे-यांवर आधारित तिकीट /बसपासची खरेदी देखील चलो ॲपद्वारे करता येते.

त्यामुळे सदर ॲप अधिकाधिक उपयुक्त असून जास्तीत जास्त प्रवाशांनी गुगल प्ले स्टोअरद्वारे चलो ॲप डाऊनलोड करुन त्याचा अवश्य लाभ घ्यावा आणि स्वतःला सुरक्षित ठेवण्याच्या मोहिमेत सामील व्हावे, असे आवाहन बेस्ट उपक्रमाद्वारे करण्यात येत आहे.

संपर्क विरहित तिकीट व बसपास खरेदी करण्याच्या या 'चलो' ॲप प्रणालीमुळे कोविड-१९, डेल्टा आणि ओमिक्रॉनच्या संक्रमणाला टाळता येऊ शकते.

सदर सुविधा htpps://play.google.com/store/apps/details?id=app.zophop या लिंकद्वारे देखील उपलब्ध आहे, याची सर्व प्रवाशांनी कृपया नोंद घ्यावी.

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक,
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

मवराडे 30/12/2021

(मनोज वराडे)
उप जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.२८
दिनांक : ३०.१२.२०२१

## लकी ड्रॉ विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ

मुंबई, ३० - ऑनलाईन वीज देयकाचे प्रदान पर्यावरण स्नेही असून वीज ग्राहकांना वापरण्यास सुलभ तसेच बेस्टच्या वीजदेयक भरणा यंत्रणेसाठीही सोपे आहे. डिजीटल पेमेंटला चालना देण्याच्या उद्देशाने बेस्ट उपक्रमाने त्यांच्या ऑनलाईन वीज देयकाचे प्रदान करणा-या ग्राहकांसाठी एक लकी ड्रॉ योजना सुरु केली आहे. सप्टेंबर २०२१ पासून सुरु करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत विजेत्यांना रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशिन, डिनर सेट, मोबाईल फोन, मिक्सर ग्राइंडर यासारख्या विविध आकर्षक भेटवस्तू दिल्या जातात.

सदर योजनेअंतर्गत तिस-या आणि चौथ्या लकी ड्रॉचा पारितोषिक वितरण समारंभ बेस्ट समितीचे अध्यक्ष मान.श्री.आशिष चेंबूरकर यांच्या शुभहस्ते बुधवार दिनांक २९.१२.२०२१ रोजी बेस्टच्या कुलाबा आगारात संपन्न झाला. यावेळी १८ विजेत्या वीजग्राहकांना बक्षिसे वितरित करण्यात आली.

सदर योजना यापुढेही सुरु ठेवण्यात येणार असून ऑफलाईन पध्दतीने वीज देयक प्रदान करणा-या वीजग्राहकांनी ऑनलाईन पध्दतीने वीज देयकाचे प्रदान करुन सदर लकी ड्रॉ योजनेत सहभागी होण्याचे आवाहन बेस्टच्या वतीने करण्यात येत आहे.

....

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्त संपादक,
कृपया प्रसिद्धिकरिता सादर

(सत्यवान इथापे)
हं. सहा. जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिद्धि पत्रक क्र.२९
दिनांक : ३१.१२.२०२१

**बेस्टच्या डिजिटल तिकीट धारकांकरिता वेगळ्या विशेष बसरांगांचे आयोजन**

मुंबई, ३१ - अलीकडेच बेस्ट उपक्रमाने चलो ॲप आणि बेस्ट स्मार्ट कार्डचे लोकार्पण केले असून एक लाखांपेक्षा जास्त प्रवाशांनी चलो ॲप डाऊनलोड करून त्याद्वारे डिजिटल तिकीट खरेदी सुरू केली आहे. बेस्ट उपक्रमाने सुरू केलेल्या या लोकोपयोगी योजनेला भरघोस प्रतिसाद दिला आहे, याबद्दल बेस्ट कडून मुंबईकरांचे जाहीर आभार.

जे प्रवासी या डिजिटल तिकीट सेवेचा लाभ घेत आहेत, त्यांच्या वेळेची आणखी बचत व्हावी, म्हणून त्यांच्याकरिता विविध ठिकाणी वेगळ्या विशेष बसरांगांची व्यवस्था बेस्ट उपक्रमाने केली आहे.

तरी अधिकाधिक प्रवाशांनी बेस्टच्या चलो ॲप द्वारे डिजिटल तिकीट खरेदी करून आपल्या वेळेची बचत करून निसर्ग संवर्धन आणि स्वास्थ्यकारक सुरक्षित प्रवास मोहिमेत सहभागी व्हावे असे आवाहन बेस्ट उपक्रमामार्फत करण्यात येत आहे.

=======

UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्त संपादक,

कृपया प्रसिद्धिकरिता सादर

(सत्यवान इथापे)

हं. सहा.जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिद्धि पत्रक क्र.३०

दिनांक : ३१.१२.२०२१

*मुंबईकर जनतेला नववर्षाची बेस्ट भेट*

मुंबई, ३१ - बेस्ट उपक्रमाने नुकत्याच लोकार्पण केलेल्या Hop On- Hop Off अर्थात Ho- Ho पर्यटन बससेवेला मुंबईकरांकडून प्रतिसाद मिळत आहे.

सदर सेवा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि जुहू चौपाटी येथून सकाळी ९ ते रात्री ८ दरम्यान चालवली जाते आणि या सेवेअंतर्गत नरिमन पॉईंट, मंत्रालय, वानखेडे स्टेडियम, तारापोरवाला मत्सालय, गिरगाव चौपाटी, बाबुलनाथ मंदिर, पेडर रोड, हाजी अली, नेहरू तारांगण, सिद्धीविनायक मंदिर, राजीव गांधी सागरी सेतू, वांद्रे रेक्लमेशन, वांद्रे बँड स्टँड, जुहू चौपाटी, भाऊ दाजी लाड संग्रहालय, जिजामाता उद्यान, ग्लोरिया चर्च अशी विविध प्रेक्षणीय स्थळे पाहता येतील. एकदा खरेदी केलेल्या तिकीटावर दिवसभराच्या पर्यटनासाठी सुविधा उपलब्ध आहे आणि आपल्या आवडत्या प्रेक्षणीय स्थळाच्या भेटीनंतर पुढील स्थळी जाण्यासाठी *Ho-Ho* बसची निश्चित सोय उपलब्ध आहे.

नववर्षाच्या निमित्ताने एक आगळीवेगळी भेट मुंबईकरांना देण्याचे बेस्ट उपक्रमाने ठरविले आहे.

उद्या दिनांक १ जानेवारी २०२२ रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, गेटवे ऑफ इंडिया, नेहरू तारांगण, जिजामाता उद्यान, वांद्रे बँड स्टँड तसेच जुहू चौपाटी येथून Hop On- Hop Off अर्थात Ho- Ho पर्यटन बससेवेचा लाभ घेणाऱ्या पहिल्या १०० प्रवाशांना *विनामूल्य* प्रवासाची भेट बेस्ट उपक्रमाकडून मिळणार आहे.

तरी कृपया मुंबईकर जनतेने याचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

=====

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(मनोज वराडे)
उप जनता संपर्क अधिकारी

ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसिध्दी पत्रक क्र.३९

दिनांक : ०३.०१.२०२२

बेस्टच्या 'चलो' ॲपला मुंबईकरांच्या भरघोस प्रतिसाद

मुंबई, ३० - बेस्ट उपक्रमाने अलीकडेच लोकार्पण केलेल्या 'चलो' ॲपला मुंबईकर जनतेचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. **दोन** लाखांपेक्षा अधिक नागरिकांनी सदर ॲप आपल्या मोबाईल ॲपमध्ये डाऊनलोड करुन त्याद्वारे तिकीट आणि बसपासची खरेदी सुरु केली आहे.

त्याचबरोबर लाईव्ह बस ट्रेकिंग, बसमधील रिकामी आसने किंवा उपलब्ध जागेची माहिती देखील अचूक दाखवणारे सदर 'चलो' ॲप अधिकाधिक लोकप्रिय होताना दिसत आहे.

तसेच सुपर सेवर योजनेमुळे घरापासून नजीकच्या रेल्वे स्थानकापर्यंत व रेल्वेतून उतरल्यानंतर पुढील नोकरीच्या ठिकाणापर्यंतचा प्रवास एका प्लॅन मध्ये समाविष्ट असल्याने प्रवास सोयीस्कर व फायदेशीर झाला आहे, याविषयी बस प्रवाशांचे अनुभव सकारात्मक आहेत. एका प्रवाशाचा अनुभव येथे देत आहे.

उदाहरणार्थ, समजा आपला रहिवास मजास आगार, जोगेश्वरी येथे आहे व नोकरीचे ठिकाण दूरदर्शन, वरळी असल्यास एका दिवसाचा प्रवास खर्च ६+६+६+६ =२४ रुपये.

महिन्यातील एकूण दिवस: ३०, त्यातील ५ दिवस साप्ताहिक रजा वगळता महिन्याचा तिकीट काढून प्रवास केल्यावर होणारा खर्च २५ x २४ = ६०० रुपये.

आता हाच ६०० रुपये खर्च करून होणारा प्रवास आपल्याला ३४९ रुपयात करून होतो व आपल्या महिन्यातील नोकरीवर जाऊन येऊन ४ x २५ अश्या १०० फेऱ्या होतात व १५० फेऱ्यां पैकी ५० फेऱ्या अधिक शिल्लक राहतात त्याशिवाय २५१ रुपयांची बचतही होते

त्याच बरोबर ज्यांचे नोकरीचे ठिकाण किंव्हा घर हे रेल्वे स्थानकानजीक आहे त्यांच्या साठी २९९ रुपयात, १०० फेऱ्यांचा यासारखे विविध प्रवासासाठी वेग वेगळे सोयीस्कर प्लान उपलब्ध आहेत.

बेस्ट उपक्रमातर्फे मुंबईकरांना आवाहन करण्यात येत आहे की, या 'चलो' ॲप बाबत **तसेच सुपर सेवर योजनेबाबत** आपल्या प्रतिक्रिया, सूचना असल्यास transport@bestundertaking.com **अथवा** contact@chalo.com या ईमेलवर अवश्य पाठवाव्यात जेणेकरुन सदर ॲप आणखी लोकाभिमुख करणे शक्य होईल.

...

...चालू करण्यात आलेल्या चलो एप मधील सुपर सेवर प्लॅन व त्यामुळे आपला होणारा फायदा खालील प्रमाणे आहे

उदाहरण:

आपला रहिवास मजास आगार, जोगेश्वरी येथे आहे व नोकरीचे ठिकाण दूरदर्शन, वरळी आहे. तर आपण प्रवास करताना तीन टप्प्यात प्रवास करतो

१. ए४४२: मजास ते जोगेश्वरी स्थानक (प्रवास भाडे ६ रुपये)

२. पश्चिम रेल्वे: जोगेश्वरी ते प्रभादेवी

३. ए१६७: प्रभादेवी ते दूरदर्शन (प्रवास भाडे ६ रुपये)

पूर्वी असा प्रवास करताना आपण फक्त एका मार्गा साठी बस पास काढायचो (मजास ते जोगेश्वरी) व प्रभादेवी रेल्वे स्थानकावरून वरळी करीता बस तिकीट काढून किंवा शेअर टॅक्सीने अधिक भाडे भरून जायचो.

परंतू सुपर सेवा प्लॅन मुळे घरा पासून नजीकच्या रेल्वे स्थानका पर्यंत व रेल्वेतून उतरल्या नंतर पुढील नोकरीच्या ठिकाणापर्यंतचा प्रवास एका प्लॅन मध्ये समाविष्ट असल्याने प्रवास सोयीस्कर व फायदेशीर झाला आहे.

प्रवास फायदेशीर कसा?

उदाहरण घेऊया ६ रुपयांचा, १५० फेऱ्या असलेला प्लॅनचे

(दर: रु ३४९, १५० फेऱ्या, २८ दिवसांकरीता)

तिकीट काढून गेल्यावर होणारा खर्च

जाताना

मजास ते जोगेश्वरी: ६ रुपये

प्रभादेवी ते वरळी: ६ रुपये

परतीचा प्रवास

वरळी ते प्रभादेवी: ६ रुपये

जोगेश्वरी ते मजास: ६ रुपये

एका दिवसाचा प्रवास खर्च ६+६+६+६ =२४ रुपये.

महिन्यातील एकूण दिवस: ३०, त्यातील ५ दिवस साप्ताहिक राजा.

म्हणजेच महिन्याचा तिकीट काढून प्रवास केल्यावर होणारा खर्च २५ x २४ = ६०० रुपये.

आता हाच ६०० रुपये खर्च करून होणारा प्रवास आपल्याला ३४९ रुपयात करून होतो व आपल्या महिन्यातील नोकरीवर जाऊन येऊन ४ x २५ अश्या १०० फेऱ्या होतात व १५० फेऱ्यां पैकी ५० फेऱ्या अधिक आवरित राहतात त्याशिवाय २५१ रुपयांची बचत होते ती वेगळी. ह्याच बरोबर ज्यांचे नोकरीचे ठिकाण किंवा घर हे रेल्वे स्थानकानजीक आहे त्यांच्या साठी २९९ रुपयात, १०० फेऱ्यांचा प्लॅन हो उपलब्ध आहे व असे बरेच विविध प्रवासा साठी वेग वेगळे सोयीस्कर प्लान उपलब्ध आहेत.

तरी सर्व प्रवाश्यांनी आप आपल्या सोयी नुसार सुपर प्लॅनचा वापर करून आपला प्रवास सोयीस्कर व फायदेशीर करून घ्यावा

...Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसिध्दी पत्रक क्र. ३२
दि. ४।७।२०२२

## अवजड उद्योग विभाग, भारत सरकार सचिवांची बेस्ट उपक्रमाला भेट

भारत सरकारच्या अवजड उद्योग विभागाचे सचिव श्री. अरुण गोयल यांनी मुंबई, नवी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि सोलापूर यासारख्या शहरांमध्ये 'फेम २' योजनेच्या अंमलबजावणीबाबत बेस्टच्या मुंबईतील इलेक्ट्रिक हाऊस, कुलाबा येथील मुख्यालयात आढावा घेतला. सदर सभेमध्ये बेस्टचे महाव्यवस्थापक श्री. लोकेश चंद्र, भा.प्र.से., उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. शेखर चन्ने, भा.प्र.से., महापालिका आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका श्री. अभिजित बांगर, भा.प्र.से. आणि अन्य महापालिका यांनी भारत सरकारच्या अन्य अधिकाऱ्यांसोबत दृकश्राव्य माध्यमातून सहभाग घेतला.

सदर आढावा बैठकीनंतर भारत सरकारच्या अवजड उद्योग विभागाच्या सचिवांनी बेस्टच्या बॅकबे आगाराला भेट देऊन बसगाड्यांचे प्रवर्तन आणि इलेक्ट्रिक बसगाड्या चार्जिंग करण्याच्या पायाभूत सुविधांची माहिती घेतली. बेस्ट उपक्रमाने इलेक्ट्रिक बसगाड्यांचे प्रवर्तन करण्यासाठी जी पावले उचलली आणि बसगाड्यांचा १००% ताफा इलेक्ट्रिक बसगाड्यांमध्ये बदलण्याचा जो धोरणात्मक निर्णय घेतला, त्याचे श्री. अरुण गोयल यांनी कौतुक केले. बेस्टने दुमजली वातानुकुलित इलेक्ट्रिक बसगाड्या आपल्या ताफ्यात दाखल करण्याचा जो निर्णय घेतला, त्याविषयी देखील सचिवांनी आनंद व्यक्त केला आणि इतर अवजड उद्योग विभागाच्या महानगरांनी देखील या दुमजली बसगाड्या ताफ्यात सामील कराव्यात, असे मत व्यक्त केले. बेस्टने 'चलो' ॲप आणि डिजिटल तिकीटाबाबत जो पुढाकार घेतला, त्याची नोंद घेताना बेस्ट सारखे देशातील इतर ठिकाणी देखील अशा प्रकारे डिजिटल तिकिट प्रणाली आणि NCMC कार्डचा वापर तिकिट पध्दतीसाठी करण्याविषयी सरकारी अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना श्री. गोयल यांनी दिल्या.

—x—

मसुदा/सही
५/१/२०२२
उप जनता संपर्क अधिकारी

ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसिद्धी पत्रक क्र. ३३
दि. ५/१/२०२२.

## बेस्ट उपक्रमाची ४ नवीन वीज देयक भरणा केंद्रे

दक्षिण मुंबईतील रहिवाशांच्या सोयीकरिता बेस्ट उपक्रमाने उद्या दि. ६ जानेवारी २०२२ पासून नरिमन पॉइंट, चर्चगेट, कफ परेड आणि कुलाबा या चार ठिकाणी असलेल्या कोटक महिंद्र बँकेच्या शाखांमधून वीज देयक भरणा केंद्रे सुरु केली आहेत.

या चारही ठिकाणी वीजग्राहक रोखीने अथवा धनादेशाद्वारे वीजदेयकाचे प्रदान करू शकतात. या अतिरिक्त वीज देयक भरणा केंद्रांमुळे वीजग्राहकांच्या वेळेची निश्चितपणे बचत होऊन सध्याच्या वीज देयक भरणा केंद्रापर्यंत जाण्याचा वेळ तसेच रांगेत उभे राहण्याचा वेळ वाचविता येईल.

वीज ग्राहकांच्या माहितीकरिता, तशा स्वरूपाचे बॅनर या नव्या केंद्रांच्या ठिकाणी करण्यात येतील, जेणेकरून त्याबाबतची ओळख प्रकर्षाने जाणवेल.

परंतु, भावी पिढ्यांसाठी निसर्ग संवर्धनाच्या बेस्टच्या "ई-देयकाचा" पुढाकाराला सहकार्य करण्यासाठी वीज ग्राहकांनी पर्याय स्वीकारावा, असे कळकळीचे आवाहन बेस्ट उपक्रमाकडून करण्यात येत आहे.

x

कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

मनोज वराडे 19/1/2022.

(मनोज वराडे)
उप जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पु...
आणि परिवहन उ...
(बृहन्मुंबई महानगरपालिका...
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र...
मुंबई - ४०० ००१.

प्रसिध्दी पत्रक क्र.३४
दिनांक : १९.०१.२०२२

## युनिव्हर्सल वाहतूक पासकरिता "चलो ॲप" डाऊनलोड करा

मुंबई, १९ - मुंबईत सध्या असलेल्या कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर आणि बेस्टच्या बसगाडयांमधून संपर्कविरहीत तिकीट देवाण घेवाण करण्याच्या दृष्टीकोनातून बेस्ट उपक्रमाने दिनांक २० जानेवारी २०२२ पासून बेस्ट "चलो मोबाईल ॲप" सोबत युनिव्हर्सल वाहतूक पास सोबत जोडण्याचा निर्णय घेतला आहे.

कोणताही प्रवासी जेव्हा तिकीट खरेदी करण्याकरिता बेस्ट चलो ॲपचा वापर करेल, तेव्हा तो युनिव्हर्सल पास सोबत जोडला जाऊन त्याची पडताळणी तिकीट मशिनद्वारे आपोआप केली जाईल. प्रवाशांना युनिव्हर्सल पास प्रत्यक्षात जवळ बाळगण्याची आवश्यकता नाही. तथापि, जो प्रवासी रोख रकमेद्वारे अथवा स्मार्ट कार्डद्वारे तिकीट खरेदी करेल, त्याला युनिव्हर्सल पास बसवाहकाला दाखविणे बंधनकारक राहिल.

सध्याच्या महामारीच्या पार्श्वभूमीवर बेस्ट उपक्रमाकडून असे आवाहन करण्यात येत आहे की, संपर्क विरहीत तिकीट देवाण घेवाण करण्याकरिता बेस्ट चलो ॲपचा वापर करावा आणि युनिव्हर्सल पास डाऊनलोड करावा. सदर ॲप प्ले स्टोअरवर उपलब्ध असून https://play.google.com/store/apps/details ?id=App.zophop. या लिंकद्वारे देखील डाऊनलोड करता येते. आयफोन आणि इतर फोनचा वापर करणा-यांनी chalo.com/app ला भेट द्यावी.

पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसिध्दी पत्रक क्र.३५
दिनांक : ०९.०२.२०२२

# "CHALO" ॲपवर आधारीत प्रवासा दरम्यान प्रवाशांना कागदी तिकीटाऐवजी मोबाईलवर तिकिट प्रदर्शित करण्यात येईल.

मुंबई,०९ - बेस्ट उपक्रमाने अलिकडेच CHALO MOBILITY प्रा.लि. या व्यवसाय संस्थेने विकसित केलेले "CHALO" या मोबाईल ॲप च्या सहाय्याने बसपास व तिकीट वितरण यंत्रणेचे अद्ययावतीकरण केलेले आहे. या प्रणालीअंतर्गत इलेक्ट्रॉनिक तिकीट इश्युइंग मशीनमध्ये रोख रकमेच्या सहाय्याने नियमित तिकीट / बसपास वितरणाबरोबरच नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (NCMC), स्मार्टकार्ड आणि भ्रमणध्वनीच्या सहाय्याने **वॅलेट** (Wallet) च्या माध्यमातून तिकीट / बसपास वितरणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. याबाबत यापूर्वीच वृत्तपत्र व अन्य प्रसिध्दी माध्यमांद्वारे प्रवाशांना आवश्यक माहिती देण्यात आलेली आहे.

भ्रमणध्वनी (Mobile) च्या सहाय्यानें तिकीट / बसपासची सुविधा प्राप्त करण्याकरीता "CHALO" ॲपच्या सहाय्याने प्रवाशांनी त्यांच्या भ्रमणध्वनीवर इच्छित प्रवासाचे तिकीट / बसपास सक्रीय करणे आवश्यक आहे. प्रवासाचे तिकीट अथवा बसपास सक्रीय केल्यानंतर प्रत्यक्ष प्रवासादरम्यान भ्रमणध्वनी स्क्रिनवरील प्रतिकृती बसगाडीमधील अथवा बसथांब्यावरील कार्यरत बसवाहकाला दाखविणे आवश्यक आहे. बसवाहकाने त्याच्याकडील तिकीट वितरण मशिनच्या माध्यमातून सदर तपशीलाची नोंद घेतल्यानंतर सदर बसपास / तिकीट प्रवासाकरीता वैध ठरेल. सद्यस्थितीत बसवाहक प्रवाशांच्या आग्रहावरुन प्रत्यक्ष कागदी तिकीटाचे वितरण करतात. परंतु **सोमवार, दि.१४ फेब्रुवारी २०२२ पासून** प्रवाशांना **'कागदी तिकीट' वितरीत करण्यात येणार नाही**. सबब, प्रवाशांनी प्रवासादरम्यान तपासणीकरीता बसनिरीक्षक अथवा अन्य पर्यवेक्षकीय कर्मचारी / अधिकारी यांनी मागणी केल्यास, आपल्या मोबाईल स्क्रिनवरील तिकीट / बसपासचा तपशील तपासणीसांना दाखविल्यास ते ग्राहय धरण्यात येईल.

आतापर्यंत ५,२५,००० प्रवाशांनी "चलो ॲप" डाऊनलोड केलेले असून दररोज १,५०,००० प्रवासी "चलो ॲप" व स्मार्ट कार्डद्वारे बेस्ट तिकीट/पास घेऊन बसमध्ये प्रवास करतात.

सर्व प्रवाशांनी या बदलाची नोंद घेऊन आवश्यक सहकार्य करावे.

.......

कृपया प्रसिध्दीकारता सादर

(मनोज वराडे)
उप जनता संपर्क अधिकारी

**प्रसिद्धी पत्रक**
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

---

प्रसिध्दी पत्रक क्र.३६
दिनांक : १०.०२.२०२२

## मुंबई शहरामध्ये Hop On – Hop Off – " Ho-Ho"
## वातानुकूलित इलेक्ट्रिक पर्यटन बस सेवा

मुंबई, १० - मुंबई शहरातील नागरिक आणि पर्यटकांना सुरक्षित आणि किफायतशीर पर्यटन बस सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून अलिकडेच लोकार्पण केलेल्या ' Hop On – Hop Off अर्थात "Ho-Ho" या इलेक्ट्रिक वातानुकूलित बससेवेमध्ये एकमजली बसगाडीसोबत शनिवार दिनांक १२.०२.२०२२ पासून खुल्या दुमजली बसगाडयांचा समावेश करण्यात येणार आहे.

सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेदरम्यान दर अर्ध्या तासाच्या अंतराने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि जुहू चौपाटी याठिकाणांहून कार्यान्वित होणा-या या बससवेचे शुल्क प्रती व्यक्ती, प्रति फेरी रुपये २५०/- इतके असून एकदा तिकीट खरेदी केल्यानंतर व्यक्ती दिवसभर विविध प्रेक्षणिय स्थळांचा मनसोक्त आनंद घेऊ शकतात. एखाद्या पर्यटनस्थळी बसगाडीतून उतरुन त्या स्थळाची पाहणी केल्यानंतर दुस-या बसने त्याच तिकीटाद्वारे पुढील पर्यटन सेवेचा लाभ घेऊ शकतात.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सुरु होणा-या या बससेवेचा मार्ग जिजामाता उद्यान (राणीबाग-भाऊ दाजी लाड वस्तूसंग्रहालय)- जुहु उद्यान- जुहू चौपाटी – वांद्रे बँड स्टँड- श्री सिद्धीविनायक मंदिर- नेहरू तारांगण- गिरगांव चौपाटी- तारापोरवाला मत्स्यालय मार्गे पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय(म्युझियम) असा प्रवासमार्ग या बससेवेमध्ये निश्चित करण्यात आलेला असून त्याव्यतिरिक्त बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय – ग्लोरीया चर्च (भायखळा)– वांद्रे रेक्लमेशन – लिलावती रुग्णालय – सिनेकलाकारांचे बंगले - लिंकिंग रोड - जुहू रोड – राजीव गांधी सागरी सेतू – नेहरु तारांगण - हाजीअली – पेडर रोड - बाबुलनाथ मंदिर – वानखेडे स्टेडियम – नरीमन पॉइंट - मंत्रालय या प्रेक्षणीय स्थळांचे बसगाडीमधून दर्शन करविण्यात येणार आहे.

तरी सर्व पर्यटक आणि मुंबईकर जनतेने शनिवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२२ पासून सुरु होणा-या या अनोख्या बदलाची नोंद घेऊन सदर पर्यटन बससेवेचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

....

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसिध्दी पत्रक क्र.३७
दिनांक : ११.०२.२०२२

## सवलतीच्या प्रवासभाडयाकरीता "CHALO" स्मार्टकार्डचे वितरण

मुंबई, ११ - बेस्ट उपक्रमाने दि.२१ डिसेंबर २०२१ पासून CHALO MOBILITY प्रा.लि. या व्यवसाय संस्थेने विकसित केलेल्या "CHALO" या मोबाईल ॲप च्या सहाय्याने बसपास व तिकीट वितरण यंत्रणेचे अद्ययावतीकरण केलेले आहे. या प्रणालीअंतर्गत इलेक्ट्रॉनिक तिकीट इश्युइंग मशीनमध्ये (ETIM) रोख रकमेच्या सहाय्याने नियमित तिकीट / बसपास वितरणाबरोबरच, "CHALO" स्मार्टकार्ड आणि भ्रमणध्वनीच्या माध्यमातून तिकीट / बसपास वितरणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

या योजनेअंतर्गत सवलतीच्या प्रवासभाडयाचा लाभ घेणारे **दिव्यांग** प्रवासी (दृष्टीहीन आणि ४०% पेक्षा जास्त शारिरीक अपंगत्व असलेल्या व्यक्ती), **ज्येष्ठ नागरीक**, बेस्ट उपक्रमाचे **सेवानिवृत्त** सेवकवर्ग सदस्य तसेच महापालिका आणि खाजगी विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालयातील **विद्यार्थी** यांच्याकरीता सवलतीच्या बसपास / तिकीटाकरीता "CHALO" **स्मार्टकार्डचे वितरण सोमवार दि.१४ फेब्रुवारी २०२२ पासून** करण्यात येणार आहे.

सवलतीच्या प्रवासभाडयाकरीता "CHALO" **स्मार्टकार्ड** वितरणाची कार्यपध्दती व वापराबाबत अन्य वैशिष्टये पुढीलप्रमाणे राहतील –

१. "CHALO" **स्मार्टकार्डवर** आधारीत सवलतीच्या बसपास / तिकीटाकरीता आवश्यक कागदपत्रे व वैधता कालावधी पुढीलप्रमाणे -

| अ.क्र. | तपशील | आवश्यक कागदपत्रं | वैधता कालावधी |
|---|---|---|---|
| १ | महापालिका शाळेतील विद्यार्थी | शाळेने प्रमाणित केलेला अर्ज | दि.१ जून ते दि.३१ मे |
| २ | खाजगी शाळा / कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी | शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाने प्रमाणित केलेला अर्ज | मासिक, त्रैमासिक व सहामाही |
| ३ | दिव्यांग (दृष्टीहीन व ४०% व अधिक कायमस्वरुपी शारिरीक अपंगत्व असलेले) | दिव्यांग प्रमाणपत्र / आधारकार्ड - छायांकित प्रतीसह | ३ वर्षे |
| ४ | ज्येष्ठ नागरीक (६० वर्षे व त्यापेक्षा अधिक) | जन्मदाखला / आधारकार्ड / पॅनकार्ड - छायांकित प्रतीसह | २८ दिवस |
| ५ | बेस्ट उपक्रमाचे सेवानिवृत्त सेवगवर्ग सदस्य | सेवाप्रमाणपत्र / आधारकार्ड / जुना बसपास (असल्यास) - छायांकित प्रतीसह | १ वर्ष |

२. विद्यार्थी सवलत अर्जाचे प्रारुप (Proforma) उपक्रमाच्या संकेतस्थळावर तसेच बसआगारांमध्ये उपलब्ध आहे.

३. उपरोक्त स्मार्टकार्ड प्राप्त करण्याकरीता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता व स्मार्टकार्ड वितरण उपक्रमाच्या सर्व बसआगारांमधील प्रशासकीय कार्यालयांमध्ये सोमवार ते शुक्रवार (सार्वजनिक सुट्टया वगळून) सकाळी ९.३० वा. ते १२.३० व दुपारी १४.०० ते १६.३० वा. या वेळेत करण्यात येईल.

४. "CHALO" स्मार्टकार्डचे शुल्क रु.७०/- + रु.१०/- प्रशासकीय शुल्क असे एकूण रु.८०/- रोख रकमेच्या स्वरुपात आकारण्यात येईल. (महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना स्मार्टकार्ड विनाशुल्क उपलब्ध करण्यात येईल)

५. भ्रमणध्वनीच्या माध्यमातून ज्या प्रवाशांनी बसपास / तिकीटाची सुविधा प्राप्त केलेली असेल त्यांना स्मार्टकार्डच्या माध्यमातून सुविधा घेता येणार नाही. तसेच ज्या प्रवाशांनी स्मार्टकार्डची सुविधा घेतलेली आहे, त्यांना भ्रमणध्वनीच्या माध्यमातून बसपास / तिकीटाची सुविधा घेता येणार नाही.

६. सवलतीच्या प्रवासाचा लाभ घेणा-या प्रवाशांनी प्रवासादरम्यान "CHALO" स्मार्टकार्डसोबत आपले ओळखपत्र देखील स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे.

७. बेस्ट उपक्रम आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या कामकाजाचे वार्तांकन करणारे अधिस्विकृतीधारक पत्रकार, कार्पोरेट कंपन्यांमधील कर्मचारी / अधिकारी, स्वातंत्र्यसैनिक, नगरसेवक, आमदार, खासदार अशा अतिमहत्वाच्या व्यक्तींकरीताचे स्मार्टकार्ड वाहतूक नियोजन कार्यालय, मुख्य प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, वडाळा आगार येथून वितरीत करण्यात येतील.

बेस्ट उपक्रमाने अलिकडेच प्रसिध्द केलेल्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे "CHALO" या मोबाईल ॲप च्या सहाय्याने प्रवाशांनी त्यांच्या भ्रमणध्वनीवर प्रवासाचे तिकीट / बसपास सक्रीय केल्यानंतर त्या तिकीटाची स्क्रीनवरील प्रतिकृती बसवाहकाला दाखविणे आवश्यक आहे, जेणेकरुन बसवाहक सदर तिकीटाची / बसपासाची नोंद घेऊन तिकीट प्रवासाकरिता वैध होईल. केवळ या प्रवाशांना दिनांक १४ फेब्रुवारी २०२२ पासून कागदी तिकीट देण्यात येणार नाही

**परंतु जे प्रवासी चलो ॲप न वापरता रोख रकमेने तिकीट खरेदी करतील त्यांना कागदी तिकीट देण्याची व्यवस्था पूर्वीप्रमाणेच कार्यरत राहील .**

तरी, बेस्टच्या प्रवाशांनी आणि मुंबईकर जनतेने जास्तीत जास्त digital ticket चा वापर करावा जेणेकरुन कागदाची बचत होईल आणि पर्यावरणाचे संरक्षण होईल. याबाबत अधिक माहिती हवी असल्यास बेस्ट उपक्रमाच्या १८०० २२ ७५५० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. सदर सेवा जनतेसाठी २४ तास उपलब्ध आहे, याची देखील सर्वांनी नोंद घ्यावी.

सर्व प्रवाशांनी या बदलाची नोंद घेऊन आवश्यक सहकार्य करावे.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसिद्धी पत्रक क्र. ३८
दिनांक - १/३/२०२२

बेस्ट उपक्रमाचे खाजगीकरण/आगार बंद नाही.

मुंबई-१ : गेल्या काही दिवसांपासून विविध संस्था, वृत्तपत्रे, समाज माध्यमांद्वारे बेस्ट उपक्रमाविषयी उलट सुलट अफवा पसरविण्यात येत असल्याचे आढळून आले आहे.

यामध्ये बेस्टची खाजगीकरणाच्या दिशेने वाटचाल, बेस्ट उपक्रमाची आगारे बंद करण्यात येत आहेत अशा प्रकारच्या खोट्या बातम्यांचे संदेश प्रसारित करण्यात येत आहेत. परंतु बेस्ट उपक्रमाच्या खाजगीकरणाचा कोणताही विचार प्रशासनाकडून सध्या किंवा भविष्यकाळात देखील नाही, हे या ठिकाणी आवर्जून नमूद करीत आहोत.

तसेच बेस्ट उपक्रमाची कोणतीही आगारे बंद करण्यात आलेली नाहीत किंवा भविष्यकाळात देखील बंद करण्याचा प्रशासनाचा विचार नाही. तरी मुंबईकर जनता, बस प्रवासी आणि बेस्टचे कर्मचारी यांनी अशा दिशाभूल करणाऱ्या खोट्या बातम्यांवर किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन बेस्ट उपक्रमाकडून करण्यात येत आहे.

बेस्ट उपक्रमाकडून प्रवाशांना अधिकाधिक चांगली आणि सक्षम सेवा देण्याच्या दृष्टीने बेस्टच्या ताफ्यामध्ये अधिकाधिक बसगाड्यांचा समावेश करण्यात येत आहे. मुंबईकर जनतेने तसेच प्रवाशांनी देखील त्यांना आणखी काय अपेक्षित आहे, याच्या सूचना बेस्ट उपक्रमाला transport@bestundertaking.com या ईमेल आयडीवर किंवा 1800227550 या टोल फ्री क्रमांकावर पाठवाव्यात, जेणेकरून प्रशासनाला योग्य सूचनांची अंमलबजावणी करून बेस्टची सेवा अधिकाधिक लोकाभिमुख करणे शक्य होईल.

---x---

सादर / पु...
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(मनोज वराडे)
उप जनता संपर्क अधिकारी

...Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसिध्दी पत्रक क्र.३९
दिनांक : ०४.०३.२०२२

## रात्रीच्या वेळेस विशिष्ट बसमार्गावरील बसफे-यांचे प्रवर्तन कार्यान्वित

मुंबई, ०४ - उपनगरीय रेल्वेसेवा रात्रौ १२.०० वा. बंद झाल्यानंतर कामानिमित्त बाहेर असलेल्या प्रवासी विशेषत: हॉस्पिटल, हॉटेल, विमानतळ अशा विविध ठिकाणी काम करणारे कर्मचारी यांना त्यांच्या घरी पोहचण्यास वाहतुकीचे कोणतेही साधन उपलब्ध होत नसल्याने अशा प्रवाशांची मोठया प्रमाणावर गैरसोय होते. ही बाब विचारात घेऊन बेस्ट उपक्रमामार्फत **रात्री १२.०० ते पहाटे ५.०० वाजेपर्यंत** प्रत्येक तासाला निम्नलिखित बसमार्गावर बससेवा सुरु करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | बसमार्ग क्र. | गंतव्यस्थान | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १. | १ | इलेक्ट्रिक हाऊस | माहीम बसस्थानक |
| २. | ६६ मर्या. | इलेक्ट्रिक हाऊस | राणी लक्ष्मीबाई चौक |
| ३. | २०२ मर्या. | माहीम बसस्थानक | पोयसर आगार |
| ४. | ३०२ | राणी लक्ष्मीबाई चौक | महाराणा प्रताप चौक(मुलुंड) |
| ५. | ३०५ | बॅकबे आगार | राणी लक्ष्मीबाई चौक |
| ६. | ४४० मर्या. | माहिम बसस्थानक | बोरिवली स्थानक (पूर्व) द्वारा देशांर्तगत आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ |

या बसमार्गावर **विना-वातानुकूलित बसगाडया सोमवार, दिनांक ०७.०३.२०२२ पासून** प्रवर्तित करण्यात येतील.

उपरोक्त बसमार्गांच्या बसफे-या रात्री उशिरा प्रवर्तित करण्यात येत असल्या तरी या बसफे-यांवर सर्वसाधारण प्रवासभाडे आकारण्यात येणार आहे. तसेच सदर बसमार्ग हे रात्री प्रवर्तित करण्यात येत असल्याने या बसमार्गावर **' हात दाखवा बस थांबवा '** ही योजना राबविण्यात येईल.

तरी, अहोरात्र चालणा-या सदर किफायतशीर बससेवेचा लाभ अधिकाधिक प्रवाशांनी घ्यावा असे आवाहन बेस्ट उपक्रमाद्वारे करण्यात येत आहे.

===

कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(मनोज वराडे)
उप जनता संपर्क अधिकारी

बेस्ट
प्रसिद्धी
पत्रक
बृहन्मुंबई विद्युत
आणि परिवहन
बेस्ट भवन, पत्र पेटी
मुंबई - ४०० ००१

प्रसिध्दी पत्रक क्र.४०
दिनांक : १६.०३.२०२२

# मुंबई शहरातील हेरिटेज टूर पर्यटन सेवा मध्यरात्रीपर्यंत

मुंबई, १६- दक्षिण मुंबईमध्ये पर्यटक आणि मुंबईकर जनतेसाठी दिनांक ०३ नोव्हेंबर २०२१ पासून खुल्या दुमजली बसगाडीतून पर्यटन सेवेचा शुभारंभ करण्यात आला असून सुरुवातीला सायंकाळी ६.३० आणि रात्री ८.०० वाजता गेट वे ऑफ इंडिया येथून दोन बसफे-या शनिवार आणि रविवार यादिवशी प्रवर्तित करण्यात येत होत्या. त्यानंतर प्रवाशांचा भरघोस प्रतिसाद लक्षात घेऊन नरिमन पॉईंट येथून दुपारी ३.०० आणि सायंकाळी ५.०० वाजता दोन अतिरिक्त बसफे-या नरिमन पॉईंट येथून सुरु करण्यात आल्या.

दिनांक २७.११.२०२१ पासून फक्त शनिवार आणि रविवार या दिवशी सकाळी ०९.३० आणि ११.०० वाजता दोन अतिरिक्त बसफे-या बेस्ट उपक्रमामार्फत चालविण्यात येत होत्या.

परंतु, सध्या उन्हाळा सुरु झाला असल्यामुळे वातावरणातील बदल लक्षात घेऊन सदर पर्यटन सेवेच्या वेळेत बदल करण्यात येत आहे. त्यामुळे सदर बससेवा दिनांक १७.०३.२०२२ पासून आठवडयातील सर्व दिवस सायंकाळी ५.०० वाजल्यापासून मध्यरात्री उशिरापर्यंत कार्यरत राहील याची प्रवाशी जनतेने नोंद घेऊन पर्यटनाचा आनंद घ्यावा,असे आवाहन बेस्ट उपक्रमाच्या वतीने करण्यात येत आहे.

पर्यटकांना तिकीट विक्रीसाठी तसेच अन्य माहितीकरिता डॉ.शामाप्रसाद मुखर्जी चौक याठिकाणी संपर्क साधता येईल. त्याशिवाय बेस्ट उपक्रमाचा टोल फी क्रमांक १८०० २२७ ५५० आणि ०२२२४१९०११७ या दूरध्वनी क्रमांकावर देखील या पर्यटनसेवेविषयी माहिती मिळू शकेल. तिकीट BookMyShow App तसेच डॉ.शामाप्रसाद मुखर्जी चौक, गेटवे ऑफ इंडिया येथे आणि बसमध्ये देखील उपलब्ध आहे.

.......

...ORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

...संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(सत्यवान इथापे)
हं.सहा.जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.४१
दिनांक : १६.०३.२०२२

## नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड पूरक बेस्ट उपक्रमाच्या बसगाड्या

मुंबई, १६ - बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाने त्यांची नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड पूरक पध्दती चाचणी तत्वावर सुरु केली आहे. या सार्वजनिक चाचणी अंतर्गत बेस्ट उपक्रमाकडून को-ब्रँडेड नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड देण्यात येईल आणि प्रवाशांकडे असलेली अन्य नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड देखील त्यांना बेस्ट उपक्रमाची तिकिटे खरेदी करण्याकरिता वापरता येणे शक्य होईल.

भारतामधील अग्रगण्य असलेल्या परिवहन तंत्रज्ञान कंपनी 'चलो' यांच्यासह येस बँक आणि नॅशनल पेमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया यांचे प्रमुख उत्पादन असलेले 'रु-पे' यांच्यासह भागीदारीमध्ये असलेली बेस्ट को-ब्रँडेड नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड जारी करण्यात आली आहेत. मुंबईकरांना त्यांचे सदर टॅप-टु-पे हे प्रिप्रेड कार्ड बसगाड्यांवर त्याचप्रमाणे मेट्रो रेल्वे, दुकाने, रेस्टॉरंट आणि ऑनलाईन यासारख्या ज्या ठिकाणी नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड आणि 'रु-पे' कार्ड स्वीकारण्यात येतात अशा ठिकाणी वापरता येतील.

### या बाबतीतील समाविष्ट असलेले मुख्य लाभ पुढीलप्रमाणे आहेत :-

- **संपूर्ण भारतामधील वाहतूकीबाबतचे प्रदान.**

  बेस्ट उपक्रमाच्या बसगाडयांमध्ये आणि ज्या ठिकाणी नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्डची अंमलबजावणी झालेली आहे. अशा ठिकाणच्या मेट्रो, रेल्वे यासारख्या भारताच्या अन्य वाहतूक व्यवस्थेमध्ये त्वरीत संपर्करहित प्रदानाकरिता सदर कार्डाचा वापर करता येईल.

- **शॉपिंग,रेस्टॉरंट,प्रवास,उपयोगिता संस्थांची देयके आणि अधिक वापराकरिता प्रदाने.**

  भारतामधील २० लाखांपेक्षा अधिक 'रु-पे' टर्मिनसच्या ठिकाणी या कार्डाचा प्रदानाकरिता वापर करता येईल.

...२...

ई-कॉमर्स संकेतस्थळ,ट्रॅव्हल पोर्टल आणि ऑनलाईन स्वरुपातील अन्य कोणतीही कार्ड प्रदाने करण्यासाठी सदर कार्डाचा वापर करता येईल.

**बेस्ट बसगाड्यांमध्ये सुलभ रिचार्ज.**

सर्व बेस्ट बसगाड्यांमध्ये बसवाहकाकडून सदर कार्ड त्वरीत रिचार्ज करता येईल. आणि सदर कार्डावरची शिल्लक रक्कम तशीच राहिल. याबाबतीतील ऑनलाईन रिचार्ज पध्दती अल्पावधीतच सुरु करण्यात येईल.

- **संपर्करहित,चिप आणि मॅग्नेटिक स्ट्रिप कार्ड.**

सदर कार्डामधून टॅप-टु-पे ही सुविधा देण्यात येत असून ज्या ठिकाणी संपर्करहित प्रदाने स्वीकारण्यात येत नाहीत अशा ठिकाणी देखील इ.एम.व्ही. चिप किंवा मॅग्नेस्ट्रिक स्ट्रीप प्रदानाकरिता सदर कार्डाचा वापर करता येईल.

बेस्ट उपक्रमाने अलिकडेच 'पुढे चला' या मार्केटिंग मोहिमे अंतर्गत बेस्ट चलो ॲप, द बेस्ट चलो बस कार्ड आणि ७२ सुपरसेव्हर प्रवासी योजनांसह डिजीटल बस प्रवासी योजना सुरु केली आहे. आतापर्यंत या योजनेव्दारे १० लाख 'चलो ॲप' डाउनलोड केले असून १.५ लाखाहून अधिक बेस्ट चलो कार्डची विक्री झाली आहे. अशाप्रकारे चलो ॲप मोठया प्रमाणावर यशस्वी झाले आहे. आता २.५ लाखांपेक्षा अधिक प्रवासी दैनंदिन डिजिटल पध्दतीने प्रदान करीत आहेत.

सध्या कार्यरत असलेल्या बेस्ट चलो बस कार्ड व्यतिरिक्त बेस्ट को-ब्रँडेड नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड देण्यात येईल आणि प्रवाशांना त्यांच्या गरजेनुसार सदरहू कार्ड वापरण्याचा पर्याय राहील. सदर पर्याय उपलब्ध झाल्यामुळे भारतामधील सर्व सार्वजनिक वाहतूक व्यवसाय संस्थांमध्ये बेस्ट उपक्रमाची डिजिटल प्रवासी योजना भारतामध्ये उत्कृष्ट ठरणार आहे. डिजिटल सुविधेमुळे बेस्ट प्रवाशांचा आरामदायी प्रवास आणि त्यांची संख्या वाढविण्याबाबत सुधारणा करण्याचे बेस्ट उपक्रमाचे उद्दीष्ट आहे. त्याचप्रमाणे बेस्ट उपक्रमासाठी डिजिटल तिकिटांमुळे रोख रक्कम हाताळणीचा खर्च आणि पेपर रोलचा खर्च कमी होईल.

**प्रारंभीक चाचणी ऑफर :-**

चाचणीचा एक भाग म्हणून बेस्ट को-ब्रँडेड नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड सुरुवातीला रु.१५० या प्रत्यक्ष किंमतीऐवजी रु.१०० एवढया रकमेमध्ये उपलब्ध असेल. सदर कार्ड सुरुवातीस निवडक बस आगारे आणि येस बँकेच्या निवडक शाखांमध्ये उपलब्ध असेल.

**नवीन कार्डाकरिता आवश्यक कागदपत्रे :-**

एस.एम.एस. ओटीपी, मोबाईल व्हेरीफिकेशन + पॅन किंवा आधार क्रमांक.

===

(मनोज वराडे)
उप जनता संपर्क अधिकारी

प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसिध्दी पत्रक क्र.४२
दिनांक : १७.०३.२०२२

# बेस्ट उपक्रमाद्वारे देयकांचे प्रदान अधिक सुलभ होणार

- *कोणत्याही देयकाचे प्रदान करण्याकरिता २४ x ७ किऑस्क आणि मोबाईल व्हॅन*

मुंबई, १७ - वीज ग्राहकांना वीज देयकाचे प्रदान सोयीस्कर व्हावे या हेतूने बेस्ट उपक्रमाने मुंबईतील १५६ ठिकाणी विविध बँकाच्या माध्यमातून अतिरिक्त वीजदेयक भरणा केंद्रे सुरु केली आहेत. त्यापैकी ठाणे जनता सहकारी बँकेच्या ६१ शाखांमधून, भारत देयक प्रदान प्रणालीच्या (BBPS) अंतर्गत असलेल्या बँकाच्या ४२ ठिकाणी तसेच कोटक महेंद्र शाखेच्या ३६ शाखांमधून आणि येस बँकेच्या १७ शाखांमधून वीजदेयकाचे प्रदान जमा करण्यासाठी बेस्ट उपक्रमाने त्यांच्या मुंबईतील सर्व शाखांना प्राधिकृत केले आहे. सदर वीजदेयक भरणा केंद्रांच्या ठिकाणांची यादी बेस्ट उपक्रमाच्या www.bestundertaking.com या वेबसाईटवर संदर्भाकरिता उपलब्ध आहे.

वीजग्राहक त्यांच्या घराजवळील किंवा कार्यालयानजिकच्या ठिकाणी जाऊन त्यांच्या सोयीने वीजदेयकाचे प्रदान करुन वेळेची बचत करु शकतात. बेस्ट उपक्रमाद्वारे सर्व वीजग्राहकांना असे आवाहन करण्यात येते की, त्यांनी या नवीन सुविधेचा लाभ घेऊन सुलभरीतीने वीजदेयकाचे प्रदान करावे त्याचप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने देखील वीजदेयकांचे प्रदान करुन वीजग्राहक प्रोत्साहनपर रकमेचा लाभ घेऊ शकतात.

बेस्टचे महाव्यवस्थापक श्री. लोकेश चंद्र यांनी अशी देखील घोषणा केली आहे की, वीज ग्राहकांना त्यांच्या वीजदेयकाचे प्रदान करण्याच्या दृष्टीने अधिक सक्षम करण्याकरिता भारताच्या राष्ट्रीय देयक महामंडळ (NPCI) या संस्थेसोबत काम सुरु असून डिजीटल इंडिया इनिशिएटिव्ह अंतर्गत Xpay या संस्थेद्वारा संचालित BBPS प्रणालीचा वापर करुन मोबाईल देयक भरणा केंद्रे सुरु करण्यात येतील. ज्याद्वारे वीजदेयकांव्यतिरिक्त पाणी, मालमत्ता आणि इतर महापालिका सेवा कर, गॅस, डीटीएच, क्रेडिट कार्ड, शैक्षणिक शुल्क, फास्ट टॅग रिचार्ज, सदस्यता शुल्क, दूरध्वनी आणि भ्रमणध्वनी यांच्या देयकांचे प्रदान, केबल तसेच ब्रॉडबॅंड सेवांचे प्रदान, बेस्टच्या किऑस्क आणि इतर देयकांचे प्रदान करण्याकरिता लवकरच पाच ठिकाणी केंद्रे सुरु करण्यात येणार आहेत.

.......